(Marathi)

1030
9/91

1520

5

P

1520
Mar

# गोळीबाराची

## चौकशी झालीच पाहिजे!

1520.



कवि:-साहेबराव कोकाटे

किंमत २ आणे

# गगन भेदी गर्जना

( चालः—लावणीची )

प्रथम वंदितो त्या देवाला ज्याने हा नरजन्म दिला।
सत्य असत्याचा जगी परिणाम हि दाखविला।
दुजे वंदन हात जोडूनी छत्रपति शिवरायाला।
ज्याने अपुल्या महा बळाने महाराष्ट्र जागाकेला।
उठ मराठ्या मर्दा आता शपथ शिवबाची तुजला।
सज्ज हो अंन्यायाशी झटण्या हरहर महादेव बोला।
दादा दादारं जिजिरं २ जी जी ॥
पहा कैसा कहर मांजला महाराष्ट्र देशात।
नव्हता एवढा जुलुम झाला ब्रिटिशांच्या काळांत।
ठार केले किति मराठे एका एका गोळीत।
बसल्या आहेत त्यांच्या माता आज अश्रु गाळीत।
मागणी अमुची गोळीबाराची करा चौकशी जाहीर।
गगन भेदी करूनी गर्जना तुम्हा सांगतो शाहीर।
दादा दादारं जिजिरं २ जीजी ॥
ऐका दादा देतो पुरावे महाराष्ट्राचा हा दास।
ची हा झाला कसाई पटेल तुम्हांला खास।
रळ भागी ऐका एका हवेलीत।
ळगी बसली होती खिडकीत।
ोळी तीच्या लागली छातीत।
डली कुमारीका ती रस्त्यात।
दादा दादारं जिजिरं २ जीजी ॥
े कुमारिकेच्या तोंडात।
महाराष्ट्र हा संयुक्त।
आता ठरूंदे रे सत्य।

स्थापन होऊं दे महाराष्ट्र मुंबईसह संयुक्त ।
करा चौकशीतिच्या खुनाची कोणी केला हा अत्याचार ।
गगन भेदी करूनी तुम्हा सांगतो शाहीर ।
दादा दादारं जिजिरं २ जीजी ॥
होम गार्ड तुम्ही ज्यांना म्हणता महा दुष्ट ते आहेत ।
२१ नोव्हेंबरच्या दिवशी कहर केला मुंबईत ।
त्या दिवशी जागो जागी केला त्यांनी गोळीबार ।
निर्दोष किति मराठ्यांना उगिच मारीले ठार ।
विचारा त्यांना न्यायासमोर का केला गोळीबार ।
गगन भेदी करूनी गर्जना तुम्हा सांगतो शाहीर ।
दादा दादारं जिजिरं २ जीजी ॥
अमुच्या कडूनी गांधी खुनाचा घेण्यासाठी बदला
परप्रांतिय पोलीसांना मुरारजी घेऊन आला ।
निरपराध मराठ्यांचे किति घेतले त्यांनी जीव ।
लहान लहान बाळांची ही आली नाहीं त्यांना कीव ।
मर्द मराठ्यांच्या हातूनी सांगा कसे ते बचणार ।
गगन भेदी करूनी गर्जना तुम्हा सांगतो शाहीर ।
दादा दादारं जिजिरं २ जीजी ।
स्ट्रायकिंग फोर्सच्या अरे दुष्टांनो तुम्ही कुठे जाणार ।
महाराष्ट्राचा देव शिवाजी आवतार आता घेणार ।
निर्दोष जिवांच सांडूनी रक्त सांगारे कुठ लपणार ।
काका तुमचा तेथे एऊनी छाती वरती बसणार ।
उचलिल शिव तुम्हा सर्वांना तरवारीच्या धारीवर ।
गगन भेदी करूनी गर्जना तुंम्हा सांगतो शाहीर ।
दादा दादारं जिजिरं २ जीजी ॥
सितारामाचा खुन केला एका कॉंग्रेसी गुंडानं ।
मुरारजिच्या पोलीसांनी त्याला दिले संरक्षण ।

# १८५७ च्या क्रांतियुद्धाच्या शतसांवत्सरिक सोहळ्याच्या निमित्तानें

# महाराष्ट्र दर्शन

भाषावार प्रांतरचनेवर भारताची विभागणी व्हावी म्हणून ज्या घटना भारतांत प्रसवल्या त्यामुळें देशांत जें इष्टानिष्ट सादपडसाद उमटलें, त्यांतून निर्माण झालेली महाबिकट घटना म्हणजेच "मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र" ही होय.

भौगोलिकदृष्ट्या, वासाइतिकदृष्ट्या व इतर अन्य प्रकारें, तसेंच रा. पु. स. नें महाराष्ट्राच्या वतीनें दिलेला कौल, त्याहूनही पुढें जातां, गुजराथखेरीज भारतातील सर्व जमातीयांनीं व प्रांतियांनीं 'मुंबई ही महाराष्ट्राची' असा निवाडा दिला असतांना 'मुंबई ही महाराष्ट्राची नाहीं.' म्हणून न्याय्य मागणीचा इन्कार करणें हें गांधीप्रणीत कॉंग्रेसनिष्ठ म्हणविणार सरकार दिवसाढवळ्या सत्य–अहिंसेचा मुडदा पाडीत आहे. महाराष्ट्राला इतिहास, परंपरा, संस्कृती व आध्यात्मिक शक्तिची जोड इतर प्रांतियाहून वरचढ आहे त्याला अन्य तोडच नाहीं. महाराष्ट्र कोणापुढें कधींही वांकला नाहीं, तो नमणार थोडाच ! मुंबई महाराष्ट्रांत नसावी असा एकमेव दावा फक्त गुजराथी बंधुंचाच आहे, हें सर्वसिद्ध झालें आहे. महाराष्ट्राच्या न्याय्य मागणीसाठीं आम्ही निदर्शनें काढलीं म्हणून जनतेवर गोळीबार व अश्रूधूर सोडण्यांत आला, यालाही जबाबदार आम्ही त्यांनाच धरतो. मग यांत राष्ट्रद्रोही कोण हे ओघानेंच येते !

महाराष्ट्राचा इतिहास व परंपरा फार उज्वल आहे. लहानपणीं आम्ही इतिहास शिकलों, त्यांत आमच्या वाचनांत अनेकदा आले कीं, 'गुजराथचा राजा बाहदुरशा' परंतु महाराष्ट्रावर कोणीही आलमगीर पदवी धारण करणारा औरंजेबासारखा कर्दनकाळही आपली सत्ता गाजवूं शकला नाहीं. "महाराष्ट्राचा राजा" छत्रपती श्री शिवाजी, 'गोब्राह्मणप्रतिपालक' म्हणून महाराष्ट्रांत गाजला व त्याची कीर्ति आज हिंगत गाजत आहे. गझनीचा महमूद गुजराथ लुटून व देव देवळे यांचा विध्वंस करून गेला, महाराष्ट्रानें अटकेपार

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1520
Date 15-1-72
GOVT. OF INDIA

# गाणे २ रे

(चालः—तन डोले मेरा मन डोले)

शूरवीरा । तूं जाग जरा । तुझा मुंबईवर अधिकार रे
मराष्ट्राचा मालक तूं ॥ १ ॥
झुंज अन्यायाशी देणे; मराठ्यांचा हा धर्म ।
व चविणे निर्दोष जीवांना, हे छात्रपतिंचे कर्म ।
बोला हरहर । कसुनी कम्बर । घ्या हाती ती तलवार रे
महाराष्ट्राचा मालक तूं ॥ २ ॥
लढतां लढतां हक्कासाठी, किती वीर गेले स्वर्गांत ।
मुंबई, बेळगांव, कारवारसह, महाराष्ट्र संयुक्त ।
मराठा जाण । मोडेल पण । नाही कधी वांकणार रे
महाराष्ट्राचा मालक तूं ॥ ३ ॥
महाराष्ट्राचा वैरी सदोबा, म्हणे आम्हाला गुंड ।
ओळखला हो दादा आम्ही त्याचा अस्सल पिंड ।
जाणार कुठं । लपणार कुठं । जागोजागी जोडे खाणार रे
महाराष्ट्राचा मालक तूं ॥ ४ ॥
गुंड म्हणतो आम्हा सर्वांना, सांगा कसा बचणार ।
सितारामाचा खून करणाऱ्या, सेनेचा सरदार ।
भूंकत सुटला । कुत्रा कुठला । कोण तुकडा देणार रे
महाराष्ट्राचा मालक तूं ॥ ५ ॥

# गाणे ३ रे

(चालः—नाखवा वल्हव वल्हव)

दाखवा नेहरूंना दाखवा । पांच वर्षांची, भाषा ही मतुची
केवळ आहे बकवा ॥ १ ॥
काका मामांची । बेकार भरती । राहील तुमच्या पाठी ।

खुनी इसमाला सोडून देणे कुठली ही लोकशाही।
मोटार ज्याने दिली त्याला कां धरले नाही।
विच्यारा त्याला ध्याया समोर कां दिली रे मोटार।
गगन भेदी करूनी गर्जना तुम्हा सांगतो शाहीर।
दादा दादारं जिजिरं २ जीजी॥

कवि कोकाटे ऐशा वेळी काय गड्यांनो करणार।
जुलुम पाहुना डोळया समोर हा रक्त नाहीका खळबळणार।
माय मराठी ज्याची जननी शांत कसा तो बसणार।
झापलेला मुलुख मराठी आता जागा करणार।
ऐकून घ्या कॉंग्रेस वाल्यांनो शेवटचाही ललकार।
महाराष्ट्रांत कॉंग्रेस ही नाही नावाला उरणार।
दादा दादारं जिजिरं २ जीजी॥

---

(चालः— जब तुम्ही चले परदेस)

साडेतीन कोटी जनता। गर्जली माता। महाराष्ट्राची
करा चौकशी गोळीबाराची॥ १॥

निर्दोष घेतले प्राण किती। वाटली नाही रे लाज कशी।
करा जाहीर चौकशी। सर्व अत्याच्यारांची।
चौकशी गोळीबाराची॥ २॥

अहो गांधी खुनाचा हा बदला। पाहिजे मुरारजी भाईला।
म्हणूनीच कापली मान। महाष्ट्राची।
चौकशी गोळीबाराची॥ ३॥

सदोबा तो झाला बेईमान। आता व्यर्थ असे त्याचं जीणं।
काय सांगु नीचता। काका, मामा, हिऱ्यांची।
चौकशी गोळीबाराची॥ ४॥

झेंडा नेऊन रोंवला व निझामासारख्या महान् शत्रूला ७ वेळा जीवदान दिले, इतकी दिलदार व सहिष्णु वृत्ति कोणत्याहि प्रांतियाकडून अपेक्षिली जाणार नाहीं. म्हणूनच आज महाराष्ट्रांत अनेक जमातींचे लोक सुखासमाधानानें नांदत आहेत; अशा परिस्थितींत आम्हाला चोर ठरवून अल्पसंख्यांकाना महाराष्ट्राकडून योग्य वागणूक मिळणार नाहीं अशी कोल्हेकुई करणाऱ्या मठ्ठ मेंदूची टाळकीं ठोकून काढलीं तर काय अयोग्य आहे !

महाराष्ट्र सत्तालोलुप असेल परंतु त्यानें शूराला वीराचें मरण निरंतर देऊन त्यानें व्यक्तिच्या सद्गुणाचा नेहमींच गौरव केला आहे. महाराष्ट्रानें सत्ता गाजविली, सत्तेचा हव्यास कधींच धरला नाहीं. परोपकारी वृत्ति, सहिष्णुता, सहकारी वृत्ति हे ब्रीद महाराष्ट्रानें कोणत्याही परिस्थितींत नष्ट होऊं दिलेले नाहीं. हें एकमेव प्रतिक महाराष्ट्राकडे जोंपर्यंत आहे तोंपर्यंत महाराष्ट्र कोणत्याही आपत्तींत, कष्टहीन परिस्थितींत कोणालाही हार जाणार नाहीं हे लक्षांत ठेवावें. तेंच प्रतिक घेऊन आम्ही आज महाराष्ट्र चळवळ सतेज करण्याचा चंग बांधला पाहिजे. आमच्यांत जातीभेद असल्याचा अनेकदां आरोप केला जातो हे खरें. पण या लढ्यानें एक सिद्ध झाले कीं, कोणतीही जमात अगर पक्ष एकजुटीनें महाराष्ट्र झेंड्याखालीं फुटीर वृत्ति सोडून प्राणपणानें झगडत आहे. अशाही परिस्थितींत राज्यकर्त्यांच्या खुनशी आव्हानाला कोणत्याही प्रकारें न घाबरतां हा लढा शिस्तीनें, संघटनेनें चालविल्यास महाराष्ट्राचा भविष्यकाळ फारच उज्वल आहे. महाराष्ट्रीय प्रकृतींचे रहस्य ज्यांना माहित आहे ते हेंच म्हणतील कीं, महाराष्ट्र हा कष्टात व संकटकाळीं फार प्रज्वलित होतो. म्हणून लोकशाही पद्धतीनें प्राणपणानें लढा लढवून आपली न्याय्य मागणी ' मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र " यासाठीं झगडून आपला हक्क प्रस्थापित केलाच पाहिजे !

**मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे !**

**गोळीबाराची चौकशी झालीच पाहिजे !!**

**शां. ना. सापळे दादर**

# गगन भेदी गर्जना

( चालः—लावणीची )

प्रथम वंदितो त्या देवाला ज्याने हा नरजन्म दिला ।
सत्य असत्याचा जगी परिणाम हि दाखविला ।
तुजे वंदन हात जोडूनी छत्रपति शिवरायाला ।
ज्याने अपुल्या महा बळाने महाराष्ट्र जागाकेला ।
उठ मराठ्या मर्दा आता शपथ शिवबाची तुजला ।
सज्ज हो अन्यायाशी झटण्या हरहर महादेव बोला ।
दादा दादारं जिजिरं २ जी जी ॥

पहा कैसा कहर मांजला महाराष्ट्र देशात ।
नव्हता एवढा जुलुम झाला ब्रिटिशांच्या काळांत ।
ठार केले किति मराठे एका एका गोळीत ।
बसल्या आहेत त्यांच्या माता आज अश्रु गाळीत ।
मागणी अमुची गोळीबाराची करा चौकशी जाहीर ।
गगन भेदी करूनी गर्जना तुम्हा सांगतो शाहीर ।
दादा दादारं जिजिरं २ जीजी ॥

ऐका दादा देतो पुरावे महाराष्ट्राचा हा दास ।
...नी हा झाला कसाई पटेल तुम्हांला खास ।
...रळ भागी ऐका एका हवेलीत ।
...लगी बसली होती खिडकित ।
...ोळी तीच्या लागली छातीत ।
...डली कुमारीका ती रस्त्यात ।
दादा दादारं जिजिरं २ जीजी ॥

...े कुमारिकेच्या तोंडात ।
... महाराष्ट्र हा संयुक्त ।
आता ठरूंदे रे सत्य ।

स्थापन होऊं दे महाराष्ट्र मुंबईसह संयुक्त ।
करा चौकशीतिच्या खुनाची कोणी केला हा अत्याचार ।
गगन भेदी करूनी तुम्हा सांगतो शाहीर ।
दादा दादारं जिजिरं २ जीजी ॥
होम गार्ड तुम्ही ज्यांना म्हणता महा दुष्ट ते आहेत ।
२१ नोव्हेंबरच्या दिवशी कहर केला मुंबईत ।
त्या दिवशी जागो जागी केला त्यांनी गोळीबार ।
निर्दोष किति मराठ्यांना उगिच मारीले ठार ।
विचारा त्यांना न्याया समोर का केला गोळीबार ।
गगन भेदी करूनी गर्जना तुम्हा सांगतो शाहीर ।
दादा दादारं जिजिरं २ जीजी ॥
अमुच्या कडूनी गांधी खुनाचा घेण्यासाठी बदला
परप्रांतिय पोलीसांना मुरारजी घेऊन आला ।
निरपराध मराठ्यांचे किति घेतले त्यांनी जीव ।
लहान लहान बाळांची ही आली नाहीं त्यांना कीव ।
मर्द मराठ्यांच्या हातूनी सांगा कसे ते बचणार ।
गगन भेदी करूनी गर्जना तुम्हा सांगतो शाहीर ।
दादा दादारं जिजिरं २ जीजी ।
स्ट्रायकिंग फोर्सच्या अरे दुष्टांनो तुम्ही कुठे जाणार ।
महाराष्ट्राचा देव शिवाजी आवतार आता घेणार ।
निर्दोष जिवांच सांडूनी रक्त सांगारे कुठ लपणार ।
काका तुमचा तेथे एऊनी छाती वरती बसणार ।
उचलिल शिव तुम्हा सर्वांना तरवारीच्या धारीवर ।
गगन भेदी करूनी गर्जना तुम्हा सांगतो शाहीर ।
दादा दादारं जिजिरं २ जीजी ॥
सितारामाचा खुन केला एका कॉंग्रेसी गुंडानं ।
मुरारजिच्या पोलीसांनी त्याला दिले संरक्षण ।

चव्हाण हिरे । मारतील फेरे । घेतील तुमच्या भेटी ।
मुरारजीभाई लाज त्याला नाही
ह्या दुष्टाला येथुनी हटवा ॥ २ ॥

सदोबा तुमचा । वैरी तो अमुचा । बडबड करतो फार ।
गुंड जमवितो । आग लावितो । एक नंबरचा चोर ।
ऐका आमचं । बरं होईल तुमचं ।
ह्याला पागलखान्यांत पाठवा ॥ ३ ॥

देशभक्तीचा । डांगोरा पिटता । नांव तुमचे मोठें ।
गांधींना स्मरता । बुद्धावर मरता । कर्म तुमचे खोटें ।
गोळ्या झाडता । मुडदे पाडता ।
व्यवहार तुमचा फसवा ॥ ४ ॥

मुंबई अमुची । भिक नको तुमची । हक्क द्या आम्हाला ।
पुन्हा एकदां । मराठी जनता । बजावते तुम्हाला ।
जागली आता । मराठी जनता ।
काका मामांचं तिकिट कटवा ॥ ५ ॥

लेखक --प्रकाशक

साहेबराव कोकाटे

C/o सेन्ट्रल प्रकाशन न्यु चर्नीरोड, मुंबई नं. ४

---

विक्रेते—एफ. बी. बुराहानपुरवाला
न्यु चर्नी रोड, मुंबई ४
मुद्रक—एन. एम्. मोरे, महादेव प्रि. प्रेस नायगांव मुंबई १४